ग्रामीण कृषि मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी – ४३१ ४०२
ईमेल – gkmsparbhani@gmail.com

**कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक - १३/२०१९-२०** **मंगळवार, दिनांक - १४.०५.२०१९**

## मराठवाडयाकरीता चालु आठवडयातील हवामान अंदाज (दिनांक १५ ते १९ मे, २०१९)

| हवामान घटक | जिल्हयाचे नांव | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | औरंगाबाद | बीड | हिंगोली | जालना | लातुर | नांदेड | उस्मानाबाद | परभणी |
| पाऊस (मिमी) | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ४०.०-४२.० | ४१.०-४२.० | ४२.०-४३.० | ४१.०-४३.० | ४०.०-४३.० | ४२.०-४४.० | ४१.०-४२.० | ४२.०-४३.० |
| किमान तापमान (अं.से.) | २४.०-२६.० | २५.०-२६.० | २७.०-२८.० | २५.०-२६.० | २५.०-२६.० | २५.०-२६.० | २५.०-२६.० | २७.०-२८.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६१ - ६६ | ५८ - ६६ | ५४ - ६४ | ६१ - ६८ | ५१ - ६४ | ४९ - ५७ | ५१ - ५८ | ५४ - ६७ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २० - २६ | २१ - २६ | २६ - ३२ | २५ - २९ | २४ - २९ | २४ - २९ | २४ - २९ | २६ - ३१ |
| वा-याचा वेग (किमी/तास) | ०८ - १० | ०९ - १२ | १२ - १४ | १२ - १५ | ११ - १४ | ०९ - ११ | ११ - १५ | ११ - १३ |
| वा-याची दिशा | पश्चिम ते वायव्य | वायव्य | वायव्य | वायव्य | वायव्य | वायव्य | वायव्य | वायव्य |

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| केळी | वाढीची अवस्था | केळी बागेस सकाळी ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब करून पाणी व्यवस्थापन करावे. केळीच्या पानांव्दारे होणा-या बाष्पीभवनाचा वेग कमी करण्यासाठी बागेत २ ते ८ टक्के केओलीनची फवारणी करावी. |
| आंबा | काढणी अवस्था | तापमानामुळे आंबा पिकांची प्रत खालाऊ नये म्हणून परिपक्व झालेल्या व काढणीस तयार असलेल्या फळांची काढणी शक्यतो सकाळी लवकर करून घ्यावी. आंबा फळांची काढणी देठासहीत करावी जेणेकरून फळांचे काढणी पश्चात आयुष्य वाढून पक्वता एकसारखी होण्यास मदत होते. काढणी पश्चात रोगांपासून संरक्षणासाठी काढणी केलेली फळे ०.१ टक्के कार्बेन्डॅझिमच्या द्रावणात बुडवून घ्यावीत. |
| द्राक्ष | छाटणी अवस्था | एप्रिल छाटणी केलेल्या द्राक्ष बागेत फुटींवर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी उपाययोजना कराव्यात. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | भाजीपाला पिकास पाणी देण्यासाठी सुक्ष्म सिंचन पध्दतीचा (उदा. ठिबक सिंचन, तुषार सिंचन) वापर करावा. पिकांना पाणी देत असताना शक्यतो सकाळी पाणी दयावे. अधिक तापमानामुळे टरबूज पिकास पाण्याचा ताण बसल्यास फळे तडकतात याच्या नियंत्रणासाठी पिकास पाण्याचा ताण बसणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| फुलशेती | काढणी अवस्था | मोगरा उत्पादकांनी मोगरा कळयांची सकाळी लवकर काढणी करावी. पूर्ण वाढलेली, घट्ट आणि बंद कळीच्या अवस्थेत फुले काढावीत. |
| तुती रेशीम उदयोग | -- | तुतीच्या पानात २४ ते २६ टक्के प्रथिने, ८ ते १० टक्के कार्बोदके आणि १३ टक्के शर्करेचे प्रमाण असते त्यामुळे बैल, गायी, म्हैस किंवा शेळी इत्यादीसाठी तुतीच्या पानाचा उत्तम खादय म्हणून वापर करता येतो. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | पशुधनाच्या कामाची वेळ सकाळी व दुपारनंतर सायंकाळच्या वेळेत ठेवावी. कुक्कूटपालन शेडच्या बाजूने पोते (बारदाना) बांधुन त्यावर पाणी शिंपडावे. पशुधनास दिवसातून ३ ते ४ वेळेस थंड व स्वच्छ पाणी पाजावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.

मुख्य प्रकल्प समन्वयक
ग्रामीण कृषि मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी